
ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 178

वर्ष ४८ | पुणे, बुधवार, ७ जून, १९७२ | अंक ११

## श्री. शंकरराव थत्ते यांच्या यशाची ही ध्वजा




उभ्या महाराष्ट्राचा एक आदरणीय बिन्दू झाली आहे.

उद्यान कार्यालयात विवाह वा उद्यान निवासात वास्तव्य हा विभागाच्या शनकातील सामाजिक प्रतिष्ठेचा प्रश्न मानला जातो.

—माहितीपत्रकाच्या पोस्टेजकरिता एक रुपयाचे पोस्टल स्टॅम्प पाठवा—

**उद्यान कार्यालय, पुणे 30**

## हिंदू विधवेला नवऱ्याकडून मिळालेली इस्टेट पुनर्विवाहानंतर ती विकू शकते

### ( मुंबई हायकोर्टाचा निकाल )

भिका शिर्के ता. १३-६-१९५६ ला मरण पावला. त्याच्या बायकोचे नाव चंद्रभागा होते. त्याला सिंधू नावाची एक मुलगीही होती. भिकाची सर्व इस्टेट त्याच्या मृत्यूनंतर त्याची विधवा बायको चंद्रभागा हिला मिळाली. भिकाच्या मृत्यूपासून ४ महिन्यांच्या आत म्हणजे १९५६ च्या ऑक्टोबर महिन्यात चंद्रभागाने पुनर्विवाह केला. तिला भिकाकडून जी इस्टेट मिळाली होती ती इस्टेट तिने ता. १६-१२-१९५८ रोजी पांडुरंगला विकली.

चंद्रभागाची मुलगी सिंधू हिने १९६० सालात एक दिवाणी दावा दाखल केला. चंद्रभागाने पांडुरंगला जे विक्रीपत्र करून दिले होते ते रद्द ठरविण्यासाठी तो दावा दाखल करण्यात आला होता. विक्रीपत्र रद्द करण्यात यावे व इस्टेटीचा ताबा आपल्याला मिळावा अशी त्या दाव्यात सिंधूची मागणी होती. चंद्रभागाने पुनर्विवाह केला असल्यामुळे भिकाच्या इस्टेटीवरील तिचा हक्क नष्ट झाला आहे व म्हणून तिला ती इस्टेट विकण्याचा अधिकार नव्हता अशा आधारावर सिंधूने तो दावा दाखल केला होता.

चंद्रभागाला भिकाची इस्टेट विकण्याचा अधिकार होता किंवा नाही हा प्रश्न ह्या अपिलात निकालात काढावयाचा आहे. नवऱ्याने पुनर्विवाहाची परवानगी दिली नसताना त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवा बायकोने पुनर्विवाह केला तर मृत नवऱ्याच्या इस्टेटीवरील तिचा हक्क नष्ट होईल अशी तरतूद हिंदू विधवांच्या पुनर्विवाहाबाबतच्या १८५६ च्या कायद्याच्या कलम २ मध्ये करण्यात आलेली आहे. ती तरतूद चंद्रभागाच्या बाबतीत लागू पडते किंवा नाही हे आम्हांला पाहावयाचे आहे. कलम २ मधील तरतुदींचा नीट विचार केल्यास असे दिसून येते की, हिंदू विधवेला तिच्या नवऱ्याकडून मिळालेल्या इस्टेटीवर फक्त मर्यादित स्वरूपाचे हक्क असतील तर ते हक्क तिच्या पुनर्विवाहामुळे नष्ट होतील. याचा अर्थ असा की, हिंदू विधवेला तिच्या नवऱ्याकडून पूर्ण मालकीहक्काने इस्टेट न मिळता तिला जे काही हक्क मिळाले आहेत ते मर्यादित स्वरूपाचे असतील तर ते मर्यादित स्वरूपाचे हक्क तिच्या पुनर्विवाहामुळे नष्ट होतात. हिंदू विधवांच्या पुनर्विवाहाबाबतचा कायदा १८५६ सालात पास झाला. त्या वेळेच्या समाजरचनेतील हिंदू विधवांचे स्थान विचारात घेता हिंदू विधवेला पूर्ण मालकीहक्काने नवऱ्याची इस्टेट मिळण्याचा प्रश्नच उद्भवू शकत नव्हता. कारण हिंदू विधवेला तिच्या नवऱ्याची इस्टेट मालकीहक्काने मिळू शकते अशी नुसती कल्पना करणे देखील त्यावेळी शक्य नव्हते. तात्पर्य असे की, पूर्ण मालकीहक्काने हिंदू विधवेला जी इस्टेट मिळते त्या इस्टेटीच्या बाबतीत हिंदू विधवांच्या पुनर्विवाहाबाबतच्या कायद्याच्या कलम २ मधील तरतुद मुळीच लागू पडत नाही.

हिंदूंच्या १९५६ चा वारसा कायद्यान्वये चंद्रभागा ही भिकाच्या इस्टेटीची मालकीण झाली. त्या कायद्याच्या कलम १४ (१) अन्वये तिला त्या इस्टेटीवर पूर्ण मालकी प्राप्त झाली. हिंदू स्त्रीला कलम १४ (१) अन्वये प्राप्त होणारे हक्क व अधिकार कोणत्याही कारणासाठी हिरावून घेता येत नाहीत असा स्पष्ट निर्णय सुप्रीम कोर्टाने ऑ. इं. रि. १९७० सु. को. १७३०; पुनिथवल्ली वि. रामालिंगम् ह्या निवाड्यात दिला आहे. ह्या सर्व विवेचनावरून असाच निष्कर्ष निघतो की, पुनर्विवाह केल्यानंतरही चंद्रभागाला भिकाची इस्टेट विकण्याचा अधिकार होता व म्हणून तिने करून दिलेले विक्रीपत्र रद्द ठरविता येत नाही.

"न्यायबोध" वरून

---


## Fergusson College, Poona 4

The College will reopen on the 15th June, 1972 for the academic year 1972-73. Applications for admission should be made in the prescribed form immediately after the results of the qualifying examinations are declared.

Students of this College seeking admission to S. Y. B. Sc. class should ensure their admission *immediately*.

D. A. Dabholkar

May 24, 1972. Principal

---

## नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे १

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर हे कॉलेज दि. १५ जून रोजी सुरू होईल.

कॉलेजमध्ये प्री डिग्रीपासून बी. कॉम. पदवी आणि एम्. कॉम्. पदवीपर्यंतचे सर्व वर्ग आहेत.

सरकारी आणि इतर शिष्यवृत्त्या आणि सवलती अनेक आहेत. गरीब विद्यार्थी, हुशार विद्यार्थी आणि उत्तम खेळाडूंना विशेष मदत केली जाते.

कॉलेजचे माहितीपत्रक टपालखर्चासकट रु. १-५० किमतीला मिळू शकेल.

व. कृ. नूलकर

प्राचार्य

७ जून, १९७२

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ७ जून, १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*


## पाकिस्तानच्या रुपयाचे सक्तीचे अवमूल्यन

पाकिस्तानने आपल्या रुपयाचे अवमूल्यन केले आहे. ह्यासंबंधी लाहोर विमानतळावरील पत्रपरिषदेत अध्यक्ष भुत्तो ह्यांनी जे वक्तव्य केले आहे त्यावरून असे मानण्यास जागा आहे की, इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाच्या अधिकाऱ्यांकडून पाकिस्तानवर दडपण आणण्यात आल्यामुळेच पाकिस्तानला हे पाऊल टाकावे लागले आहे. अध्यक्ष भुत्तो ह्यांनी असे कारण दिले की देशांतील किंमती वाढत चालल्यामुळे हा उपाय योजावा लागला; बाहेरील दडपणाशी त्याचा काही संबंध नाही. तथापि ह्या संदर्भात बोलतांना, त्यांनी असेही उद्गार काढले की इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाचा पाकिस्तान हा सदस्य असल्यामुळे चलनाच्या अवमूल्यनाचा निर्णय घेण्यात आला. आंतरराष्ट्रीय चलनांच्या देवघेवीत समतोल राखण्याचे काम फंडाला करावे लागते. आंतरराष्ट्रीय चलनांच्या देवघेवीत समाधानकारक दर ठेवण्याच्या कामी सभासद असलेल्या देशांनी सहकार्य करावे अशी विनती फंडातर्फे गेल्या वर्षी करण्यात आली होती. त्यावरून व अध्यक्ष भुत्तो ह्यांनी काढलेल्या उद्गारावरून फंडाच्या अधिकाऱ्यांनी आग्रह धरल्यामुळेच पाकिस्तानच्या रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले असावे ह्या तर्कास भरपूर आधार मिळतो. पत्रपरिषदेत आपली भूमिका विशद करताना अध्यक्ष भुत्तो ह्यांनी अवमूल्यनाची तरफदारी केली. ते म्हणाले की, अवमूल्यनामुळे काही थोडा काळ लोकांना अडचणींना तोंड द्यावे लागेल. परंतु अखेर हा निर्णय पाकिस्तानचे मोठे हित करून देणारा ठरेल. अवमूल्यनामुळे किंमती एकदम चढू लागण्याचा संभव आहे. परंतु ह्या परिस्थितीचा फायदा घेऊ पाहाणाऱ्यांना शिक्षा करण्यात येईल.

---

## नॅशनल टेक्स्टाईल कॉर्पोरेशनला नफा

नॅशनल टेक्स्टाइल कॉर्पोरेशनचा १९७०–७१ सालचा अहवाल लोकसभेला सादर करण्यात आला. कॉर्पोरेशनला अहवालाच्या साली ४·८८ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाल्याचे त्यावरून दिसून येते. संघटनेच्या कारभाराचा खर्च आणि प्राप्तीवरील कराचा भरणा केल्यानंतर हा नफ्याचा आकडा काढण्यात आला आहे. ५·७ लाख रुपये प्राप्तीवरील कर कॉर्पोरेशनला भरावा लागला. कॉर्पोरेशनची स्थापना १९६८ साली करण्यात आलेली आहे. सरकारने ताब्यात घेतलेल्या कापडगिरण्या चालविण्याचे काम कॉर्पोरेशनकडे सोपविण्यात आले होते. या ना त्या कारभारविषयक दोषांमुळे बंद पडलेल्या गिरण्या सरकारने ताब्यात घेतल्या होत्या. ह्या गिरण्यांना सामान्यपणे 'आजारी गिरण्या' असे संबोधण्यात येते. अशा आजारी गिरण्यांची पुनर्घटना करून त्या पुन्हा व्यवस्थित चालू करण्याचे काम कॉर्पोरेशनने करावयाचे होते. कॉर्पोरेशनने अशा १२ गिरण्यांचा तांत्रिक व आर्थिक दृष्टीने अभ्यास करून सरकारला शिफारसी करावयाच्या होत्या. कॉर्पोरेशनने केलेल्या शिफारसी लक्षात घेऊन सरकारने आतापर्यंत ७ गिरण्यांबद्दल आदेश दिले आहेत. १२ गिरण्यांपैकी ५ गिरण्यांची पुनर्घटना करण्याचे हुकूम देण्यात आले असून २ गिरण्यांचा कारभार गुंडाळण्याचे ठरविण्यात आले आहे. अहवालाच्या वर्षी सरकारच्या सल्ल्याला अनुसरून कॉर्पोरेशनने आणखी ६ गिरण्यांचा कारभार आपल्या हाती घेतला आहे. अशीच टेक्स्टाइल कॉर्पोरेशन्स महाराष्ट्र, गुजरात, तामीलनाडू, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश ह्या राज्यातून स्थापन झालेली आहेत.

---

## खोटी वैद्यकीय बिले दाखवून पैसा मिळविला

ओरिसा विभागातील पोस्ट व टेलिग्राफ खात्यातील नोकरांनी १९७१–७२ सालात खोटी वैद्यकीय मदतीची बिले दाखवून ४९ लाख रुपये मिळविले अशी माहिती त्या विभागाच्या पोस्ट मास्टर जनरलनी जाहीर केली आहे. मध्यवर्ती सरकारच्या नोकरांना मोफत वैद्यकीय मदत मिळते. त्यासंबंधीच्या भ्रष्टाचाराची ही कथा आहे. काही नोकरांनी डॉक्टर्स आणि औषधविक्रेते ह्यांच्याशी संगनमत करून खोटी बिले केली आणि त्यांचे पैसे खात्याकडून घेतले. काही डॉक्टर्स खात्यातील नोकरांना महागड्या औषधांची जरूरी असल्याचा दाखला देतात आणि मिळालेल्या पैशात आपला वाटा ठेवतात. शिवाय, नोकरांच्या वैद्यकीय तपासणीची फीही ते घेतात. ह्या भ्रष्टाचाराच्या प्रकारात औषधविक्रेतेही सामील आहेत. डॉक्टरकडून औषधाच्या जरूरीचा दाखला घेतल्यावर ती औषधे विक्रेत्याकडून घेतली जातात असे मात्र नाही. औषधे न घेताच विक्रेता खोटी बिले देतो आणि ती खात्याकडून वसूल झाल्यावर त्यांपैकी बराच हिस्सा बळकावतो. ह्या सर्व लबाडीच्या मामल्यात खुद्द नोकरांच्या पदरी बिलाच्या रकमेपैकी जेमतेम ५० टक्के रक्कम पडते. पण ती फुकट मिळत असल्याने त्याबद्दल त्यांना काही वाटण्याचे कारण नसते. बाकीची रक्कम डॉक्टर्स आणि औषधविक्रेते ह्यांच्या खिशात जाते. चौकशी अंती असे दिसून आले आहे की, दरमहा १५० ते २०० रुपये मिळविणाऱ्या नोकरांनी आपल्या वेतनाच्या दुप्पट रक्कम ह्या मार्गाने मिळविली आहे.

## बांगला देशावर बड्या राष्ट्रांची छाया

### भारताचे सावध धोरण

बांगला देश पाकिस्तानच्या जोखडातून मुक्त झाल्यावर तेथे साहजिकच अनेक कठीण प्रश्न उभे राहिले. नवीन राज्य अजून सुरळीतपणे चालू झालेले नाही. तेथील अवघड परिस्थितीचा फायदा घेऊन बडी राष्ट्रे आपला प्रभाव वाढविण्याची खटपट सतत करीत आहेत. ह्या बाबतीतील त्यांच्यातील स्पर्धा इतकी तीव्र होत आहे की कधी कधी तिला छोट्याशा थंड्या युद्धाचे स्वरूप येऊ पाहाते. म्हणूनच गेल्या काही दिवसांत भारताच्या व बांगला देशाच्या पंतप्रधानांना तेथील लोकांना सावध राहण्याचा इशारा द्यावा लागला. कारण परदेशीय हितसंबंधी लोक भारत व बांगला देश ह्यांच्यात दुरावा उत्पन्न करण्याचे प्रयत्न करीत आहेत. अमेरिका आपले तेथील स्थान पुन्हा मिळविण्याची कोशीस करीत आहे. परंतु ह्या बाबतीत अमेरिकन प्रतिनिधींनी स्वीकारलेले धोरण दूरदर्शीपणाचे नाही. त्यांची अशी समजूत झालेली आहे की बांगला देशातील अमेरिकेचे वजन वाढविण्यासाठी प्रथम रशियाची प्रतिमा डागाळली पाहिजे. ह्याचा परिणाम असा होत आहे की रशिया स्वतःची प्रतिष्ठा राखण्यासाठी अधिक नेटाने प्रयत्नशील होत आहे. याह्याखान ह्याच्या राजवटीला अमेरिकन सरकारने दिलेल्या पाठिंब्याची आठवण रशिया तेथील लोकांना एकसारखी करून देत आहे. त्यामुळे अमेरिकेचा प्रभाव पसरणे फारच अवघड होऊन बसले आहे. चीनही ह्या बाबतीत मागे राहिलेला नाही. बांगला देशातील अती जहाल गटांना हाताशी धरून भारताविरुद्ध द्वेषाचे व संशयाचे वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न चीन करीत आहे. हे लोक अमेरिका व रशिया संधिसाधू असल्याचा प्रचार करीत आहेत.

ह्या सर्व प्रचाराचा व प्रतिप्रचाराचा असा परिणाम झाला आहे की भारताला बांगला देशात दुय्यम स्थान प्राप्त होण्याचा धोका निर्माण झाला आहे. वास्तविक भारताने बांगला देशाच्या मुक्तीसंग्रामात आणि नंतरही अत्यंत मोलाची मदत केलेली आहे. समाधानाची बाब इतकीच की बांगला देशातील जनतेत जो राष्ट्रवाद नव्याने उफाळला आहे त्यात भारताबद्दलच्या कृतज्ञतेचा बळकट धागा मूळ धरून आहे. तथापि भारताला सामर्थ्यवान् परदेशीय शक्तीशी मुकाबला करावा लागत आहे. बांगला देशातील लोकांच्या जीवनाची घडी नीट बसण्याचे काम अवघड असून ते अद्याप नीट मार्गी लागलेले नाही. बांगला देशाला परदेशाकडून सध्या मिळत असलेल्या मदतीत भारताचा वाटा खूप मोठा आहे. पण बड्या देशांच्या मदतीचा नगारा अधिक जोराने वाजविला जात आहे. शिवाय, भारताला खोट्यानाट्या जातीय प्रचाराला तोंड द्यावे लागत आहे. चीनच्या धोरणाचे कडवे पुरस्कर्ते ह्यात आघाडीवर आहेत. भारतावर राजकीय दडपणाचे आरोप तर ते करीतच आहेत. पण, त्याशिवाय विद्यार्थ्यांना हाताशी धरून भारताविरुद्ध चिथावणी देत आहेत. बांगला देशांतील स्थानिक व्यापारी जनतेच्या अडचणींचा फायदा घेऊन आपले उखळ पांढरे करण्यात मागे नाहीत. त्यांनी चालविलेली नफेबाजी, साठेबाजी भारताच्या माथी मारण्यात येत आहे. इतकेच काय पण चोरट्या व्यापाराचे खापरही भारतावरच फोडण्यात येत आहे. बांगला देशाने भारताबरोबर जे मैत्रीचे संबंध जोडले आहेत त्याचा परिणाम लोकांना भोगावा लागत आहे असे भासविण्यात येत आहे. म्हणूनच भारताने बांगला देशातील घडामोडीबाबत सावध धोरण स्वीकारले आहे.

---

### खनिज तेलाबाबत स्वयंपूर्णता अद्याप दूर

हिंदमध्ये खनिज तेलाचे साठे हुडकून काढण्यासाठी रशियन तज्ज्ञांचे एक मंडळ १९७० साली भारतात आले होते. मंडळाने आपला अहवाल आता सरकारला सादर केला आहे. भारतातील तेलाच्या संभाव्य साठ्याच्या अहवालात तांत्रिक आणि आर्थिक दृष्टीने विचार करण्यात आला आहे. जवळच्या भविष्यकाळात तरी भारत तेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकणार नाही असा निष्कर्ष मंडळाने काढला आहे. अशुद्ध खनिज तेलाच्या साठ्यांसंबंधी मंडळाने असा अभिप्राय व्यक्त केला आहे की १९८० च्या सुमारास जास्तीत जास्त ६·४ कोटी टन तेलाचे साठे भारताला उपलब्ध होतील. अर्थात् ह्या तेलाचे शुद्धीकरण करणारे कारखाने नसतील तर ते उभारावे लागतील अगर असलेल्या कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढवावी लागेल. सध्याची उत्पादनक्षमता लक्षात घेता वार्षिक १·२ कोटी टन तेलाचे उत्पादन होऊ शकेल. परंतु भारताची अशुद्ध तेलाची गरज सतत वाढत चालली आहे. ती लक्षात घेता दरसाल ५ कोटी टन अशुद्ध तेलाची आवश्यकता आहे. ऑइल आणि नॅचरल गॅस कमिशनच्या उत्पादनाचाच येथे विचार केला आहे. रशियन तज्ज्ञांनी खनिज तेलाचा जो अंदाज केला आहे त्यासंबंधी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. त्यांनी गुजरात आणि आसाम राज्यात तेलाचा जो शोध केला तेवढ्यापुरताच त्यांचा अंदाज आहे. भारतात इतर काही ठिकाणी तेलाचा शोध लावण्याचे काम चालू आहे. परंतु ह्या शोधात अद्याप म्हणण्यासारखे यश आलेले नाही. म्हणून रशियन तज्ज्ञांनी इतर ठिकाणचे तेलासंबंधीचे खोदकाम लक्षात घेतलेले नाही.

---

### अशोक हॉटेलचा अजब पाहुणा

ज्या दरोडेखोराला पकडून देणारास १·३५ लक्ष रुपयांचे बक्षीस जाहीर केलेले होते, तो माधवसिंग दिल्ली येथे सर्वोदय नेते श्री. जयप्रकाश नारायण ह्यांस भेटावयास गेला, तेव्हा तो अशोक हॉटेलमध्ये उतरला होता.

---

## पोस्ट खात्याची नवीन आयुर्विमा पॉलिसी

पोस्ट आणि टेलिग्राफ खात्याने आपले आयुर्विम्याचे काम वाढविण्यासाठी वैद्यकीय तपासणी न करता ३,५०० रुपये किंमतीपर्यंतच्या पॉलिसी देण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या आयुर्विम्याचे काम फक्त पोस्टाशिवाय आयुर्विमा कॉर्पोरेशनच करत असते. त्याला ही एक प्रकारची स्पर्धाच म्हटली पाहिजे. १ जून १९७२ पासून ह्या नव्या पॉलिसी देण्याला प्रारंभ करण्यात आला आहे. मध्यवर्ती व राज्य सरकारांचे नोकर, स्थानिक स्वराज्य संस्थांचे नौकर, विद्यापीठे आणि सरकारी अनुदान मिळणाऱ्या संस्थांचे नौकर, संरक्षण खात्याशी संबंधित असलेले लोक, पोस्टाचे कामगार, इत्यादींना नव्या विमापत्रकांचा फायदा घेता येईल. मात्र ज्या नौकराचे वय विमापत्रक घेण्याच्या वेळी २८ वर्षांपेक्षा कमी असेल त्यांनाचा पॉलिसीसाठी पात्र ठरविण्यात येईल. भारतात पोस्टातर्फे आज अनेक वर्षे विमा-पॉलिसी देण्यात येत आहेत. परंतु पोस्टाच्या ह्या धंद्याला मध्यवर्ती सरकारच्या अर्थ खात्याकडून फारसे उत्तेजन मिळालेले नाही. आयुर्विमा कॉर्पोरेशनकडेच मेहरनजर वळलेली दिसते. तरीही गेल्या वर्षी पोस्ट खात्याने २५,४९८ नव्या पॉलिसी दिल्या. त्यांची दर्शनी किंमत ९·६४ कोटी रुपये भरली. त्या-मागील वर्षात खात्याने २३,८७२ नव्या पॉलिसी दिल्या होत्या. त्यांची दर्शनी किंमत ८·९२ कोटी रुपये भरली होती. विम्याच्या धंद्यात पॉलिसीवर होणारे बोनस आणि विम्याचे अल्प दर ह्यांना महत्त्व असते. खात्याच्या म्हणण्या प्रमाणे ह्या दोन्ही बाबतींत पोस्टाचा विमा आकर्षक ठरला आहे. म्हणूनच सालोसाल खात्याच्या नव्या धंद्यात सतत वाढ होत आहे.

---

## व्हिएटनाममधील युद्धातील अमेरिकेची संहारक साधने

व्हिएटनाममध्ये सध्या चालू असलेले युद्ध हे इतिहासातील अत्यंत क्रूर म्हणावे लागेल. ह्या युद्धात अमेरिकेची विमाने वापरीत असलेली संहारक साधने भयंकर स्वरूपाची आहेत. युद्धात टाकला जाणारा एक प्रकारचा बॉंब फुटल्याबरोबर त्यातून वाफेच्या स्वरूपातील जळण बाहेर पडते आणि त्याचा हवेशी संपर्क आल्याबरोबर प्रचंड स्फोटाचा दणका उडतो. ह्या एका बॉंबची बरोबरी करण्यास मोठा ५०० पौंडाचा बॉंब उडवावा लागेल. आणखी एका प्रकारचा बॉंब पहिल्यांदा बनविण्यात आलेल्या अणुबॉंबच्या तोडीचा आहे. त्याचा स्फोट झाल्यावर ३,००० फूट जमिनीच्या विस्तारावर कोणत्याही प्रकारचे जीवन तग धरू शकत नाही. व्हिएटनाममधील युद्धात उत्तर व्हिएटनामचे सैनिक घनदाट जंगलाचा आधार घेऊन लढतात. जंगलाचे संरक्षण त्यांना मिळू नये म्हणून एक निराळाच बॉंब अमेरिकन विमानदल वापरते. त्याचे वजन १५ हजार पौंड आहे. त्याचा स्फोट झाल्यावर हवेत विलक्षण दाब उत्पन्न होऊन एखाद्या फुटबॉलच्या मैदानाएवढे जंगल साफ नाहीसे होते. जंगलात दडून राहणे अशक्य व्हावे म्हणून अतिशय विषारी रसायनांचा मारा विमानांतून करण्यात येतो. त्यामुळे हजारो वृक्षाच्छादित जंगले क्षणात निष्पर्ण होऊन जातात. अशा प्रकारच्या रासायनिक फवाऱ्यामुळे दक्षिण व्हिएटनाममधील १५ टक्के भूभाग पूर्णपणे ओसाड बनलेला आहे. उलटपक्षी व्हिएटकॉंग सैनिकही अमेरिकेशी सहकार्य करणाऱ्या लोकांशी अमानुष क्रूरतेने वागतात. त्यांच्या हाती दुसरे काहीच हत्यार नसते.

---

## स्वस्त किंमतीचा यंत्रचलित नांगर

उत्तर प्रदेशातील कृषि-औद्योगिक कॉर्पोरेशन १९७५ साली सामान्य शेतकऱ्याला परवडेल असा यंत्रचलित नांगर तयार करून बाजारात आणणार आहे. हा नांगर १४ अश्वशक्तीचा असेल. तो तयार करण्यासाठी पूर्व युरोपातील एका कारखान्याशी सध्या वाटाघाटी चालू आहेत. त्याशिवाय २५ अश्वशक्तीचे यंत्रचलित नांगरही कॉर्पोरेशन बनवीत आहे. ते लवकरच बाजारात येतील. त्याची किंमत प्रत्येकी सुमारे २५ हजार रुपये असेल. आतापर्यंत कॉर्पोरेशनने ५ हजार ट्रॅक्टर्सची जुळणी करून त्यांची सर्व हिंदुस्थानभर विक्री केली आहे. १९७१–७२ साली कॉर्पोरेशनने ४० लाख रुपये किंमतीच्या विविध प्रकारच्या शेतकीच्या अवजाराची विक्री केली.

---

**धान्याची वाहतूक थंडावली** — मे महिन्यात भारताने २ लाख ३ हजार टन अन्नधान्य बांगला देशाला पाठविण्याचे ठरविले होते. भारताच्या ६ बंदरातून निघणाऱ्या १६ बोटी वाहतुकीचे काम करणार होत्या. परंतु खरी अडचण पुढेच आहे. बांगला देशात दगडी कोळशाची टंचाई असल्याने अनेक रेल्वे एंजिने थंडावली आहेत. कित्येक रेल्वे स्टेशनावर भारताकडून आलेल्या धान्याच्या ३ हजार वॅगन्स जागच्या जागी पडून आहेत.

**मनुष्यरहित हवा-निरीक्षक** — फ्रेंच हवामान शास्त्रज्ञांनी हवामानाचे निरीक्षण करणारे एक मनुष्यरहित निरीक्षक-स्थानक बनविले आहे. ते संपूर्णपणे स्वयंचलित आहे. पृथ्वी भोवती ९०० किलोमीटर अंतरावरून भ्रमण करणाऱ्या एका फ्रेंच हवाई निरीक्षक उपग्रहाला ह्या स्थानकाकडून हवामानासंबंधी माहिती पुरविण्यात येईल.

**पाचव्या योजनेसाठी उत्पन्नाची तरतूद**—पाचव्या पंच-वार्षिक योजनेच्या पूर्तीसाठी जादा ६,००० ते ७,५०० कोटी रुपये उभे करावे लागतील, असे योजना मंत्र्यांनी म्हटले आहे. ह्यांपैकी २,५०० कोटी रुपये राज्यांना आणि बाकीचे केंद्राला उभे करावे लागतील.

**ऑडिटची सक्ती**—ज्या फर्म्सची विक्री किंवा उलाढाल ५ लक्ष रुपयांपेक्षा जास्त आहे किंवा ज्यांचा करपूर्व नफा ५०,००० रु. पेक्षा अधिक आहे अशा फर्म्सच्या हिशेबाचे ऑडिट सक्तीचे करावे, अशी वांछू कमिटीची शिफारस आहे. ती सत्वर अमलात आणावी असा अर्थमंत्र्यांना तगादा करण्यासाठी यंग चार्टर्ड अकौंटंट्स् फोरमचे शिष्टमंडळ त्यांची भेट घेणार आहे.

## मध्यवर्ती सरकारचे कर्मचारी

१९६१ मध्ये मध्यवर्ती सरकारच्या नोकरीत २०·९४ लक्ष कर्मचारी होते, त्यांची संख्या १९७० मध्ये २८·५१ लक्ष एवढी झाली, म्हणजे ती ३६% ने वाढली. दरसाल कर्मचाऱ्यांची संख्या ३·६% ने वाढली, अशी सरासरी पडते. अर्थात, सालोसाल होणाऱ्या वाढीत खूपच तफावत असते.

| ३१ मार्च | | | संख्या ( लक्ष ) |
|---|---|---|---|
| १९६१ | ... | ... | २०·९४ |
| १९६२ | ... | ... | २१·५६ |
| १९६३ | ... | ... | २३·४९ |
| १९६४ | ... | ... | २५·३६ |
| १९६५ | ... | ... | २६·३७ |
| १९६६ | ... | ... | २७·१० |
| १९६७ | ... | ... | २७·४६ |
| १९६८ | ... | ... | २७·९३ |
| १९६९ | ... | ... | २८·०७ |
| १९७० | ... | ... | २८·५१ |

एकूण कर्मचाऱ्यांपैकी ५१·३४% रेल्वेजमध्ये, १७·८४% संरक्षण खात्यात, १४·०६% दळणवळण खात्यात आणि ४·३६% अर्थ खात्यात आहेत. एकूण कर्मचाऱ्यांपैकी कायम नोकरी असणारांचे प्रमाण ७०% च्या आसपास कायम राहिले आहे. एकूण कर्मचाऱ्यांपैकी ५०% कर्मचाऱ्यांचा मासिक पगार १५० रु. पेक्षा कमी होता.

खालील तक्त्यात कर्मचाऱ्यांची पगारानुसार वर्गवारी केली आहे.

| पगाराचे माप | कर्मचाऱ्यांची संख्या | एकूणशी प्रमाण |
|---|---|---|
| ७५ चे खाली. | ९४ | — |
| ७५–९९ | ३,१९३ | ०.१२ |
| १००–१४९ | १३,१३,५९२ | ४९.५९ |
| १५०–१९९ | ४,७०,६२० | १७.७६ |
| २००–२९९ | ४,९३,६९७ | १८.६४ |
| ३००–३९९ | २,१२,४४० | ८.०२ |
| ४००–४९९ | ७७,३८५ | २.९२ |
| ५००–७४९ | ४९,२४७ | १.८६ |
| ७५०–९९९ | १५,४६३ | ०.५८ |
| १०००–१४९९ | १०,२३९ | ०.३९ |
| १५००–१९९९ | २,२४१ | ०.०८ |
| २०००–२४९९ | ६०३ | ०.०२ |
| २५००–२९९९ | ३३२ | ०.०१ |
| ३००० च्या पुढे | १८९ | ०.०१ |
| एकूण | २६,४९,२०५ | १००.०० |

## बद्रीकेदार यात्रेला अफाट गर्दी

हिमालयाच्या परिसरातील बद्रिनाथ, केदारनाथ, गंगोत्री आणि जम्नोत्री ह्या पवित्र स्थानांना भेट देण्यासाठी ह्या वर्षी यात्रेकरूंची अफाट गर्दी हृषीकेशला जमली आहे. ही चारही स्थाने यात्रेकरूंना दर्शनासाठी एकाच दिवशी खुली होण्याचा हा बहुधा पहिलाच प्रसंग असावा. महाराष्ट्र, गुजरात, हरयाना, राजस्थान आणि पश्चिम उत्तर प्रदेश ह्या राज्यांतील ग्रामीण भागांतील लोकांनी एप्रिलअखेर पासूनच यात्रेला येण्यास सुरुवात केली. यात्रेकरूंच्या गर्दीच्या मानाने वाहातुकीची साधने अपुरी पडत आहेत. त्यामुळे हजारो यात्रेकरू अडकून पडले आहेत. ही पर्वणी साधून टॅक्सीवाल्यांनी आपले दर दुपटी पेक्षाही जास्त चढविले आहेत.

## डोळ्यांवरील रोगांवर किरणांचा यशस्वी वापर

डोळ्यांवरील रोगांवर शस्त्रक्रिया करण्याचा प्रसंग आला म्हणजे रोगी धास्तावतो. डोळा हे इंद्रिय अतिशय नाजूक आणि अत्यंत महत्त्वाचे असल्याने शस्त्रक्रिया टाळून डोळे बरे करण्याचे प्रयत्नच प्रथम करण्यात येतात. परंतु अनेकदा शस्त्रक्रिया टाळता येत नाही. अशापैकी 'ग्लोकोमिआ' नावाच्या दृष्टिदोषावर 'लासर' किरणांचा वापर करून डोळे बरे करण्यात रशियन शास्त्रज्ञांना यश आले आहे. ह्या दृष्टिदोषाने पछाडलेल्या १० रोग्यांवर उपचार करून त्यांना रोगमुक्त करण्यात आले. शस्त्रक्रियेऐवजी 'किरण' वापरण्याची ही रीत अगदी अल्पवेळ लागणारी आहे. त्यामुळे रोग्याला वेदनांची जाणीव होण्यापूर्वीच उपायाची अखेर होते. 'लासर' किरणांचा रोगमुक्ततेसाठी झालेला हा पहिलाच प्रसंग आहे.

## सागराच्या अभ्यासाचे राष्ट्रीय केंद्र

पणजीपासून १० किलोमीटर अंतरावर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशिनोग्रॅफी ह्या संस्थेसाठी मोठ्या इमारती बांधण्यात येत आहेत. झुआरी आणि मांडवी नद्यांच्या बेळक्यातील एका पठारावर बांधण्यात येत असलेल्या ह्या इमारतींसाठी ३·४ कोटी रुपये खर्च येणार आहे. सध्या संस्थेच्या मुख्य प्रयोगशाळेच्या उभारणीचे काम चालू आहे. सर्व इमारती बांधून पुऱ्या होण्यास तीन-चार वर्षे लागतील. त्या इमारती पुऱ्या झाल्या म्हणजे एक भव्य सभागृह, एक जीवशास्त्रीय संशोधनशाळा, एक रासायनिक संशोधनशाळा आणि एक हवामान शास्त्रीय प्रयोगशाळा इतक्या इमारतींचा संच तयार होईल.

## बिले चुकविण्याच्या युक्त्या

### बिल वसुलीच्या धंद्याची पार्श्वभूमी

ग्रेट ब्रिटनमध्ये कर्जे वसूल करून देणाऱ्या कंपन्यांची संख्या वाढत आहे: हायर परचेस पद्धतीने तेथे फार मोठ्या प्रमाणावर खरेद्या केल्या जातात. अशा खरेद्यांचे पोटी सुमारे २,५०० कोटी रुपयांची कर्जे दरसाल निर्माण होतात. म्हणजे, दर माणशी ४०० रुपये, असा कर्जाचा हिशेब होतो. ह्यापैकी ४०० कोटी रुपये तरी वसूल होत नाहीत. गिऱ्हाइके ठरल्याप्रमाणे उधारीचे पैसे देत नाहीत, ह्यामुळे लहान दुकानदारांना दिवाळे काढण्याची पाळी येते. "अमेरिका, रशिया किंवा जपान येथून येणे रक्कम सत्वर मिळते, परंतु सरकारी खात्यांकडून येणे असलेली रक्कम मिळण्यासाठी नऊ नऊ महिने थांबावे लागते असे" तेथील एका उद्योगपतीने म्हटले आहे. "आर्थिक पत आता एवढी खालावली आहे की वसुलीसाठी पुनः पुनः स्मरणपत्रे पाठवावी लागतात." असे दुसऱ्या एका उद्योगपतीने म्हटले आहे.

बिलांची रक्कम न देण्यासाठी नाना प्रकारच्या युक्त्या योजण्यात येतात. चेकवर मुद्दामच सही न करता तो पाठवायचा किंवा वाण्याच्या बिलाचा चेक कापडवाल्याकडे आणि कापडवाल्याच्या बिलाचा चेक वाण्याकडे पाठवायचा, असे चालते. एकादा हुशार बिलबुडव्या स्वतःचाच सेक्रेटरी बनतो आणि खालीलप्रमाणे पत्र टाइप करून पाठवितो. "आपले बिल पोचले आहे. मालक परगावी गेले आहेत, त्यांचेकडे आपले बिल त्यांच्या अनुमतीसाठी पाठवीत आहे." एका पठ्याने तर खालीलप्रमाणे पत्र पाठवले, "माझ्या अनेक बिलांपैकी कोणत्या बिलाचे पैसे द्यावयाचे, ते ठरविण्याकरिता मी चिठ्या टाकून निर्णय घेतो. ह्या महिन्याला आपले बिल चिठ्ठीत आले नाही. तुम्ही एकसारखी स्मरणपत्रे पाठवीत राहिला तर पुढील महिन्यात चिठ्या टाकण्याचे वेळी तुमचे बिल वगळले जाईल ह्याची कृपया नोंद घ्यावी."

सरकारी खात्यांची बिले चुकविण्याची ही युक्ती पाहा: संदर्भाचे आकडे बदलून टाकावयचे. "तुमचे FC/३४२६१/SOB हे पत्र पोचले. त्यासंबंधात मी आपणास लिहिलेले PM/३२/G५ हे पत्र पाहावे. त्या पत्रात आपल्या NGB/५७४८६९३/PS ह्या पत्रातील मुद्द्यांना मी उत्तरे दिली आहेत." हे संदर्भ शोधून काढण्यात सरकारी कर्मचाऱ्यांची दमछाट झाल्याविना राहात नाही.

---

### करबुडव्यांना दंड

"कर बुडविण्याच्या इच्छेने जो मनुष्य बाजारात विक्री करीत नाही, आड मार्गाने प्रवास करतो, संध्याकाळी किंवा रात्री माल विकतो आणि विकलेल्या पदार्थांची संख्या कमी दाखवितो, त्याला कर द्यावयाच्या आठपट दंड करावा."

"व्यापारी लोकांनी घ्यावयाचा फायदा व्यवहारचतुर माणसाकडून ठरवून घेऊन त्याचा विसावा भाग कर म्हणून राजाने घ्यावा."

—मनुस्मृति


**D. E. Society's**

**Brihan Maharashtra College of Commerce**

**Poona-4.**

## "Admission For The Academic Year 1972-73."

The College will reopen on 15th June, 1972 for the academic year 1972-73. Enrolment will begin from 2nd June 1972. In view of the limited accommodation, admissions to the B. Com. Part. I, S. Y. B. Com. and T. Y. B. Com. classes will be given in the first instance to the students of this College. Students from other Colleges will be admitted, only if any vacancies are available. However, there are a number of vacancies available in S. Y. B. Com. Class. Students interested in securing admission to S. Y. B. Com. should apply immediately. The students of this College should take admission before 10-6-1972.

**Hours for Admissions :— 11·00 a. m. to 2·00 p. m**

(1) Students should note the following College timings for the new academic year :—

P. D. Com. and T. Y. B. Com. : 8-00 a.m. to 11-20 a.m.

B. Com. Pt. I & S. Y. B. Com. : 11-45 a. m. to 2-45 p.m.

(2) The programme of enrolment for the various classes will be as follows :—

| | |
|---|---|
| S. Y. B. Com. and T. Y. B. Com. | From 2nd June to 5th June. |
| P. D. Com. | : From 6th June to 10th June. |
| B. Com. Part I | : From 14th June to 18th June. |
| M. Com. | : From 16th June to 20th June. |

( M. Com. Classes will begin from 1st July 1972 ).

Students of this College must bring their Identity Card with them at the time of registering their names.

(3) Students seeking admission to the Pre-Degree Commerce class should bring with them the following along with the admission form :—

(1) S. S. C. Statement of Marks ( Two typed copies of the same )

(2) School leaving certificate ( do )

(3) Identity card-size photograph ( Two copies )

Forms of application for admission and Copies of the Prospectus will be available in the College Office during Office hours.

N. K. Kulkarni
Principal.

Date : 3-6-1972

## पुरीचे जगन्नाथ देवालय आर्थिक अडचणीत

पुरी येथील प्रख्यात जगन्नाथ देवालय आर्थिक अडचणीत सापडले आहे. सध्या देवालयाचा कारभार अॅडिशनल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटतर्फे चालविला जातो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे देवालयाचे उत्पन्न दरसाल ६ लाख रुपयांपर्यंत खाली आले आहे. वार्षिक खर्च मात्र २० लाख आहे. ह्याचा अर्थ देवालयात येणाऱ्या भक्तांची संख्या कमी झाली आहे असा मात्र नाही. देवालयाचा खर्च भागविण्यासाठी अनेक जमिनी पूर्वीपासून देण्यात आलेल्या आहेत. जमिनी करणाऱ्या शेतकऱ्यांकडून देवालयाला खंड मिळत असे. परंतु ओरिसा सरकारने जमीनमहसूल रद्द केल्यापासून अनेक खंडकऱ्यांनी देवालयाला खंड देण्याचे बंद केले आहे. त्याचा परिणाम उत्पन्नात घट होण्यात झाला आहे. देवालयाच्या दप्तरी जमिनीसंबंधी असलेली माहिती अपुरी व सदोष आहे. त्यामुळे खंडकऱ्यांविरुद्ध कायदेशीर उपाय योजणे अवघड होऊन बसले आहे. देवालयात देवदर्शनासाठी रोज सुमारे ५ हजार भक्त व यात्रेकरू येतात. उत्सव समारंभासारख्या प्रसंगी त्यांची संख्या रोजची २० हजारापर्यंतही जाते. त्यांच्याकडून मिळणाऱ्या देणग्यांवर सध्या कारभार चालला आहे. देवालयाला भक्तांकडून मिळणाऱ्या देणग्या स्वीकारण्याचे काम करण्याची तयारी स्टेट बँक ऑफ इंडियाने दाखविली आहे. देशात व परदेशात लंडन, न्यूयॉर्क सारख्या मोठ्या शहरांतूनही देवालयाला देणग्या मिळतात. देवालयाला मिळणाऱ्या देणग्यावर प्राप्तीकर आकारला जात नाही. देवालयाने दीर्घ मुदतीच्या ठेवी बँकेकडे ठेवलेल्या आहेत. त्यावरील व्याजाचा दर बँकेने अर्ध्या टक्क्याने वाढविण्याचे ठरविले आहे. चार धामांपैकी असलेले पुरीचे देवालय ८०० वर्षांचे जुने आहे.

## खाद्य तेलासाठी सूर्यफूल आणि सोयाबीनची लागवड

सामान्य नागरिकांच्या जीवनात खाद्यतेलाला असाधारण महत्त्व आहे. तेलबियांपासून निघणाऱ्या ह्या तेलामुळे गरिबांची स्निग्ध पदार्थाच्या आहाराची गरज भागते. पण भारतात गरजेच्या मानाने तेलबियांचे उत्पादन अपुरे पडते. १९७१-७२ साली तेलबियांचे एकूण उत्पादन सुमारे ९१·३७ लाख टन झाले. ह्या वर्षी उत्पादनाचे जे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते त्यापेक्षा प्रत्यक्ष उत्पादन ४ लाख टनानी कमी झाले. तेलबियांचे उत्पादन वाढविण्याच्या बाबतीत एक मोठी अडचण आहे. ती म्हणजे दर एकरी अधिक उत्पादन देणाऱ्या तेल बियाणाचा अभाव. ह्या अडचणीमुळे तेलबियांच्या उत्पादनात प्रगती होणे अवघड जात आहे. फक्त एरंडेलाच्या तेलबियाबाबत मात्र सुधारलेले बियाणे उपलब्ध आहे. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून परदेशात चांगली पिके देणाऱ्या तेलबियांकडे सहाजिकच लक्ष जाते. अशा परदेशीय तेलबियांपैकी सूर्यफूल आणि सोयाबीन ह्या दोनच तेलबिया भारताला उपयोगी पडण्यासारख्या आहेत, असे दिसून आले आहे. यांपैकी सूर्यफुलाचे पीक दक्षिण भारतात अधिक उपयुक्त ठरण्यासारखे आहे. उत्तर भारतात सोयाबीनचे पीक अधिक चांगले येण्याची शक्यता दिसून आली आहे. सोयाबीनची लागवड वाढविण्याचा प्रयोगात्मक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. १९७१-७२ साली ४ लाख हेक्टर जमिनीत सोयाबिनची लागवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे १९७३-७४ साली काही निवडक सूर्यफुलांच्या जातीच्या बियाण्यांखाली ३·५ लाख हेक्टर जमीन आणण्याचा कार्यक्रम आखण्यात आला आहे.

## ब्रिटनमधील हिंदी डॉक्टरांच्या तक्रारी

ब्रिटनमधील इस्पितळांतून काम करणाऱ्या हिंदी डॉक्टरांच्या संख्येचा नक्की आकडा सांगता येत नाही. परंतु त्यांची संख्या ७ हजाराच्या आसपास असावी असा अंदाज आहे. हिंदी डॉक्टर्स अलीकडे काही तक्रारी करू लागले आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे व्यावसायिक शिक्षण देण्याच्या सोयी सवलतीबाबत त्यांना समानतेने वागविण्यातयेत नाही; भेदभाव केला जातो. ब्रिटिश डॉक्टरांना इस्पितळातील अनुभव घेण्यासाठी जशा संधी देण्यात येतात तशा हिंदी डॉक्टर्सना देण्यात येत नाहीत. त्यांना महत्त्वाची कामे देण्यात येत नाहीत. त्याचप्रमाणे वरिष्ठ श्रेणीतील जागाही त्यांना देण्यात येत नाहीत. वैद्यकीय ज्ञानातील एखाद्या खास शाखेचे ज्ञान संपादन करण्याच्या संधी आधीच थोड्या आहेत. त्यामुळे हिंदी डॉक्टर्सना त्या मिळण्याची शक्यता आणखीच कमी होत आहे.


# म. ए. सो. वाणिज्य महाविद्यालय, पुणे ४.

* नव्या वर्षासाठी १५ जून १९७२ ला महाविद्यालय उघडेल.
* अॅडव्हान्स्ड अकौन्टन्सी, अॅडव्हान्स्ड कॉस्ट अकौन्टन्सी व इन्डस्ट्रीयल मॅनेजमेंट या विषयांची बी. कॉम्. पदवीसाठी अध्यापनाची सोय.
* एम. कॉम्. कोर्सचे पदव्युत्तर अभ्यासकेंद्र. १९७२-७३ ला नव्या एम. कॉम्. कोर्सच्या पहिल्या भागाचे अध्यापन.
* परिपूर्ण ग्रंथालय, खेळाच्या सोयी, वैयक्तिक लक्ष पुरविणारा अध्यापक वर्ग व परीक्षांचे उत्तम निकाल.
* हुशार, गरजू व लायक विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी योग्य साहाय्य.

या कॉलेजात १९७१-७२ मध्ये असलेल्या व मार्च-एप्रिल १९७२ मध्ये झालेल्या प्री-डिग्री व एस्. वाय्. या विद्यापीठाच्या परीक्षांत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपला निकाल लागल्याबरोबर तत्काळ पुढील वर्गात प्रवेश घ्यावा. उशीरा आल्यास प्रवेशाची शाश्वती नाही.

१ जून १९७२

शं. बा. चिरमुले
प्राचार्य

### साहित्यिक स्वरूपाच्या पुस्तकांची अजूनही अधिक निर्मिती

रेडिओ आणि टेलिव्हिजनच्या आजच्या युगात ज्ञानप्रसाराचे एक महत्त्वाचे साधन म्हणून पुस्तकांची गणना करावी लागेल. अजूनही भारतात पुरेशी पुस्तके प्रसिद्ध होत नाहीत आणि जी प्रसिद्ध होतात त्यांतील ५० टक्के अगर अधिक पुस्तके साहित्यिक म्हणजेच वाङ्मयीन स्वरूपाची असतात; कथा, कादंबरी, नाटके ह्यांसारख्या मनोरंजक साहित्याला सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्व असले तरी भारतासारख्या देशांना सध्या काही वर्षे तरी शास्त्रीय विषयावरील पुस्तकांची अधिक गरज आहे. अशा पुस्तकांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे देशातील शिक्षणपद्धती सुधारण्याचे कामही अवघड होऊन बसलेले आहे. देशी भाषांतील लेखकवर्गाला ह्याविषयी फारशी जाणीव दिसत नाही. देशात प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची जी सूची करण्यात आली आहे त्यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येते. हिंदी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या दर दहा पुस्तकांपैकी तीनपेक्षाही जास्त पुस्तके वाङ्मय-प्रकारात मोडणारी असतात. मराठी आणि बंगाली भाषेतील पुस्तकांपैकी तर निम्मी अगर अधिक पुस्तके वाङ्मयीन स्वरूपाची असतात. सर्वच देशी भाषांत शास्त्रीय विषयाच्या पुस्तकांची संख्या फार थोडी आहे. ह्याउलट इंग्रजी भाषेत प्रकाशित करण्यात येणाऱ्या १,२०० पुस्तकांपैकी फक्त १८८ पुस्तके वाङ्मयीन स्वरूपाची होती, २३९ पुस्तके शुद्ध शास्त्रविषयक होती आणि ४५५ पुस्तके व्यावहारिक शास्त्रीय विषयांवरील होती. शास्त्रीय विषयांवरील पुस्तकांविषयीची ही अनास्था विकासाच्या आड येणारी फार मोठी अडचण ठरणार आहे.

---

### कुटुंबनियोजन कार्यक्रमावरील खर्च

कुटुंबनियोजनावर भारताने १९५१ ते १९७१ ह्या मुदतीत १६९ कोटी रुपये खर्च केले असून ७४ लक्ष अर्भकांचा जन्म त्यामुळे टळला आहे. १९७०–७१ अखेरच्या कामामुळे १९९१–९२ पर्यंत २ कोटी, ६०लक्ष अर्भकांचे जन्म टळलेले असतील.

| वर्ष | खर्च (दशलक्ष रु.) | किती अर्भकांचा जन्म टळला (हजार) |
|---|---|---|
| १९५१-६१ | २३.०१ | — |
| १९६१-६२ | १३.९३ | ३२ |
| १९६२-६३ | २७.७२ | ५३ |
| १९६३-६४ | २१.७२ | ८६ |
| १९६४-६५ | ६५.२३ | १२४ |
| १९६५-६६ | १२०.०० | २०९ |
| १९६६-६७ | १३३.८० | ५२४ |
| १९६७-६८ | २२०.०० | ८९८ |
| १९६८-६९ | २३०.०० | १४१७ |
| १९६९-७० | ३८९.८० | १८५९ |
| १९७०-७१ | ४५०.०० | २२३८ |
| | १६९२. २ | |


महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

**डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स**

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे.

संस्थापक—कै. प्रा. ग. कृ. भोपटकर ] : स्थापना १९१८ : [ टेलिफोन नंबर ५४११०

नवीन वर्षासाठी बुधवार, दि. २१ जून, १९७२ पासून स्वतःच्या नवीन भव्य इमारतीत वर्ग सुरू होतील.

— महत्त्वाचे अभ्यासक्रम —

(१) गव्हर्नमेन्ट कमर्शिअल डिप्लोमा कोर्स (जी. सी. डी.) : मुदत : एक वर्ष, किमान पात्रता : एस्. एस्. सी.
वेळा : सकाळ, दुपार किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी. विद्यार्थिनींसाठी फक्त सकाळच्या वेळेत स्वतंत्र वर्ग.

(२) प्री–डिग्री कॉमर्स एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता : इंग्रजी आणि गणित किंवा अंकगणित घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी.

(३) प्री–डिग्री आर्ट्स् एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता : इंग्रजी घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी.

— इतर अभ्यासक्रम —

बी. कॉम्. पार्ट वन व पार्ट टू एक्स्टर्नल परीक्षा, स्पेशल बी. कॉम्. एक्स्टर्नल परीक्षा, डी. कॉम्., कंपनी सेक्रेटरी, कॉस्टिंग, इंग्रजी-मराठी टाइपरायटिंग, इंग्रजी शॉर्टहॅन्ड, बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

माहिती-पत्रक : ५० पैसे

अ. ग. भोपटकर
एम्. कॉम्., एल्एल्. बी.
प्राचार्य

व. द. रिसबूड
बी. ए., बी. कॉम्.
उप-प्राचार्य

### धंदेवाईक फर्म्समध्ये कॉम्प्युटर बसविण्याच्या अटी

**प्रो. दांडेकर समितीचा अहवाल**

व्यापारी आणि औद्योगिक फर्म्समध्ये कॉम्प्युटरचा उपयोग त्याला कामगाराची मान्यता असेल तरच केला जावा, अशी शिफारस भारत सरकारने प्रो. वि. म. दांडेकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिपक्ष समितीने एकमताने केली आहे. "कामगारांची संमती नसेल तर हा प्रश्न राष्ट्रीय पातळीवरील द्विपक्ष मंडळाकडे सोपविण्यात यावा; त्या मंडळात मालकवर्ग आणि कामगारवर्ग ह्यांचे प्रतिनिधी असतील. ह्या मंडळाचा अभिप्राय एकमताचा असेल तर तो बंधनकारक होईल. एकमत झाले नाही, तर पुन: खालच्या पातळीवर वाटाघाटी व्हाव्यात. कॉम्प्युटरची सोय पब्लिक सेक्टरने उपलब्ध करून द्यावी आणि त्याचा फायदा फर्म्सनी घ्यावा. शैक्षणिक, संशोधन आणि शास्त्रीय संस्था, केंद्र आणि राज्य सरकारांच्या आकडेवारी-विषयक शाखा, संरक्षण खाते, ह्यातून कॉम्प्युटर वापरण्यास मोकळीक असावी; अर्थात विद्यमान रोजगारीवर त्याचा विपरीत परिणाम होऊ नये ह्याची योग्य दक्षता घेतली जावी." समितीच्या अशा इतर शिफारसी आहेत.

---

### दि बँक ऑफ कराड लि. चा रौप्यमहोत्सव

दि बँक ऑफ कराड लि.चा रौप्यमहोत्सव गुरुवार, दि. ८ जून रोजी साजरा होणार आहे. अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण हे प्रमुख पाहुणे आहेत. त्यांच्या हस्ते बँकेचे संस्थापक-चेअरमन कै. नानासाहेब देशपांडे ह्यांच्या चरित्राचे प्रकाशन होईल. बँकेकडे आता ३·५ कोटी रु. च्या ठेवी असून तिचे खेळते भांडवल ४·२५ कोटी रु. आहे. तिच्या १२ शाखा असून त्यापैकी मुंबईत आणि पुण्यात प्रत्येकी एक शाखा आहे.

---

### अमेरिकेतील असुरक्षित जीवनाची कारणमीमांसा

(१) खासगी अत्याचारात वाढ — (वॉलेसच्या खुनाचा प्रयत्न हे त्याचे ताजे उदाहरण)

(२) न सुटणाऱ्या समस्या — महागाई, बेकारी, शहरी जीवनाची अधोगती.

(३) वांशिक तेढ — जेथे जेथे पाहावे, तेथे तेथे.

(४) आर्थिक प्रगतीमध्ये प्रदेशाप्रदेशांत समतोलाचा अभाव.

(५) पार्लमेंटची अगतिकता व जिव्हाळ्याच्या प्रश्नावर अध्यक्ष आणि काँग्रेस ह्यांचे सतत दुमत.

(६) बुद्धिमान लोकांच्या मताला लाथडण्याची प्रथा.

(७) युद्धात पत्करावा लागलेला कमीपणा आणि नामुष्की.

—डॅनिअल बेल ह्या अमेरिकन समाजशास्त्रज्ञाने केलेले विश्लेषण.

---

टोकिओ मधील टेलिफोन—टोकिओ शहरात प्रत्येक १०० लोकसंख्येस ५९ टेलिफोन असे प्रमाण पडते.


**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.





**हे व्यर्थ न हो बलिदान!**

डिसेंबर-१९७१ मध्ये झालेल्या;
भारत-पाक युध्दात ज्या जवानांनी वीरमरण पत्करले अगर जे जवान अपंग झाले अशांच्या कुटुंबियांना चरितार्थ चालविण्यासाठी, लघुद्योग, कुटीरोद्योग अगर एखादा छोटासा व्यापार सुरू करण्यास बँक कर्ज देईल.

अधिक तपशीलासाठी संपर्क साधा.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

स्थापना-१९३६ ● मुख्य कचेरी-चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा ● शेड्युल्ड बँक

# ओगले
## प्रभाकर कंदील

◆ अंधाऱ्या रात्री,
◆ वादळी वाऱ्यात,
◆ ओबड-धोबड रस्त्यावर,
◆ खवळलेल्या दर्यावर

मार्गदर्शक व विश्वसनीय.

तयार करणार
ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड
ओगलेवाडी ( जि. सातारा )

BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth, BELGAUM

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay Office at Mandvi, Bombay – 9.


OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT — *General Manager.*
K. B. KIRTIKAR — *Chairman.*

कार्यक्षम आणि फायदेशीर पंपाची परीक्षा कशी कराल?

# किर्लोस्कर 'केडी' मोनोब्लॉक पंप

● पंपाची बांधणी मजबूत असल्यानें झीज कमी व त्यामुळें दुरुस्तीचा खर्च कमी होतो.
● विजेच्या खर्चात बचत होते. ● कमी वेळांत जास्त पाणी ओढू शकतो. त्यामुळे कामाचा जलद उरक व मजुरीच्या खर्चात बचत होते.




## खर्चात होणाऱ्या बचतीमुळे किर्लोस्कर 'केडी' पंपाची किंमत लवकर वसूल होते व कर्जफेडीची हमी देता येते.

सोपी रचना, सुबक कारागिरी, बळकट व आटोपशीर बांधणी या वैशिष्ट्यामुळें किर्लोस्कर 'केडी' पंप अधिक कार्यक्षम असून ते विपुल प्रमाणात पाणी पुरवठा करतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि, उद्योग भवन. टिळक रोड, पुणे २

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी : ९ बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी : महाल, नागपूर

| सांपत्तिक स्थिती | ३०-६-१९७१ रोजी |
|---|---|
| १. भांडवल व निधी | रु. १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. ९३३१ लाख |
| ३. कर्जे | रु. १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

**सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक**

डॉ. वा. पु. श्रीश्रीमाळ, कार्यकारी संचालक

श्री. नि. श्री. सपकाळ, एम्. ए., एलएल. बी., अध्यक्ष



| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूरध्वनी |
|---|---|
| | मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स) |
| | कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन) |
| | उपकार्यालय नं. १: २६०३०६ नं. २: २९०००६ |

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी, अध्यक्ष

रा. गो. गोखले, व्यवस्थापक

जी. पी. भावे, कार्यकारी संचालक





नोंदविला आहे. — Tom & Bay/KO-7182-M



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )